XY9AAA
SYBMM(M)

Creative Writing (Marathi)

(80)
(L)

वेळ : २.३० तास | गुण : ७५

सूचना १) सर्व प्रश्न सोडवा.
२) उजवीकडील संख्या गुण दर्शवितात.

**प्रश्न १ ला :** खाली दिलेल्या घटकांचा वापर करून एका काल्पनिक व्यक्तिचित्रावर आधारित कथा लिहा. (१५)

१. शहरात किंवा गावात राहणारा.
२. खाद्य सवयी.
३. धार्मिक श्रद्धा.
४. भावंड.
५. मित्र - मैत्रिणी.
६. पालक.
७. जन्मस्थळ.
८. ताण-तणावाच्या परिस्थितीतील वागणं.
९. आवडता चित्रपट प्रकार /व्हिडीओ गेम्स.
१०. वरील मुद्द्यांशी निगडीत तुमच्या आवडीचे आणखी विशेष

**प्रश्न २ रा :** **अ.** पत्रकारितेत सर्जनशीलतेचे कोणते पैलू असतात? भारतीय आणि पाश्चात्य माध्यमांमधील सर्जनशीलतेतील फरक सांगा. (१५)

**किंवा**

**ब.** मुद्रितशोधन आणि संपादन यांचे महत्त्व पुस्तक प्रकाशनासंदर्भात स्पष्ट करा. (०८)

**क.** पुस्तक प्रकाशनातील व्यावसायिक व्यवहार्यता सांगा. (०७)

**प्रश्न ३ रा :** **अ.** 'प्लॅस्टिकमुक्ती' या विषयावर रेडिओसंहिता लिहा. (०८)

**ब.** आशयसूत्र आणि पात्र यांचे लघुकथेतील महत्त्व सांगा. (०७)

**किंवा**

**ब.** तुमच्या आवडत्या विषयावर कविता लिहा (०८)

**क.** तुम्ही अलीकडेच पाहिलेल्या चित्रपटाचे परिक्षण करा. (०७)

**प्रश्न ४ था :** **अ.** खालील कवितेचे आशयसूत्र, रचना, अलंकार, प्रतिकात्मता आणि प्रतिमा या घटकांच्या आधारे विश्लेषण करा. (०८)

XY9AAA

**आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे - बालकवी**

आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे ।।धृ।।

वरती खाली मोद भरे, वायूसंगे मोद फिरे
नभांत भरला, दिशांत फिरला, जगात उरला
मोद विहरतो चोहिकडे ।।१।।

सूर्यकिरण सोनेरी रे, कौमुदि ही हसते आहे
खुलली संध्या प्रेमाने, आनंदे गाते गाणे
मेघ रंगले, चित्त दंगले, गायन स्फुरले
इकडे तिकडे, चोहिकडे ।।२।।

नीलनभी नक्षत्र कसे, डोकावुनि हे पाहतसे
कुणास बघते ? मोदाला, मोद भेटला का त्याला?
तयामधे तो, सदैव वसतो, सुखे विहरतो
इकडे तिकडे चोहिकडे ।।३।।

वाहति निर्झर मंदगती, डोलति लतिका वृक्षतती
पक्षी मनोहर कूजित रे, कोणाला गातात बरे?
कमल विकसले, भ्रमर गुंगले, डोलत वदले
इकडे तिकडे, चोहिकडे ।।४।।

**ब.** प्रथम पुरुषी निवेदनाचा दृष्टिकोन म्हणजे काय ते विविध उदाहरणांच्या आधारे सांगा. (०७)

**किंवा**

**क.** कवितेची भाषा आणि दैनंदिन व्यवहारातील भाषा यांच्यातील फरक सांगा. (०८)

**ड.** चित्रपट बनविण्यासाठी लघुकथेची निवड कोणत्या निकषांच्या आधारे केली जाते. (०७)

**प्रश्न ५ वा :** खालीलपैकी कोणत्याही **तीन** टिपा लिहा. (१५)

१. विनोद.
२. लोकप्रिय कल्पनारम्यता.
३. ग्राफिक कादंबरी.
४. स्त्रीवादी साहित्य.
५. विज्ञाननिष्ठ साहित्य.